९४/

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३४७/प्रनिप्रा/२३ सप्टेंबर/२०२४/6060 दिनांक : २३/९/२०२४.

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. न्या. वि.एल. अचलिया (से.नि.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, <u>दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा.</u> झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), २) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ३) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. यांच्या वतीने श्री. हरिविजय शिंदे, सहा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे हे उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई हे अनुपस्थित होते.

श्री. आर.एल.लोंढे, परिक्षा समन्वयक, तंत्रशिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

<u>विषय क्रमांक १</u> : <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्रशिक्षण विभागातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेकरिता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (ई.डब्ल्यू.एस.) प्रमाणपत्र सादर करण्याकरिता सवलत देण्याबाबत सीईटी कक्षाने सादर केलेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.</u>

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता तंत्रशिक्षण विभागातील विविध पदवी व पदव्युत्र पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून असे निदर्शनास आले आहे की, उमेदवारांची कागदपत्रांची ई-पडताळणी करतेवेळी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील उमेदवारांनी शासन

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण

निर्णयातील प्रमाणपत्राच्या नमुन्यानुसार प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य होते. परंतू काही उमेदवारांनी केंद्र सरकारच्या नमुन्यात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी असलेल्या इनकम अँड ॲसेट प्रमाणपत्र उपलोड केलेले असून ई-पडताळणी व प्रत्यक्ष पडताळणी करताना त्यामध्ये त्रुटी काढण्यात आलेली नाही. परिणामी काही उमेदवारांचे प्रवेश विविध संस्थांमध्ये निश्चित झालेले आहेत. त्याचप्रमाणे काही उमेदवारांचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीनंतर मुळ प्रमाणपत्र जमा न केल्यामुळे संगणक प्रणालीद्वारे स्वयंचलित रद्द करण्यात आलेले आहेत.

विषयांकित प्रकरणी आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली व तद्नुषंगाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला,-

१) वरील बाबी तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता तंत्रशिक्षण विभागातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरिता केंद्र सरकारच्या नमुन्यात EWS प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनाने विहित केलेल्या नमुन्यानुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र सादर करण्याकरिता ९० दिवसांची मुदत वाढ देण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला, जे उमेदवार या मुदतीमध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करण्यास असमर्थ ठरतील, असे प्रवेश विहित पदध्दतीनुसार रद्द करण्यात येतील.

२) तथापि, ज्या उमेदवारांचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीनंतर आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे कोणतेही प्रमाणपत्र जमा न केल्यामुळे संगणक प्रणालीद्वारे स्वयंचलित रद्द करण्यात आलेले आहेत, अशा प्रकरणी मुदत वाढ करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

प्रस्तूत प्रकरणी आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये सादर करावा, असे निर्देश देण्यात आले.

**<u>विषय क्रमांक २:</u>** **<u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>**

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

न्या. वि.एल. अचलिया (से.नि.)
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण,

दिनांक : २३-०९-२०२४